(4)

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/७४१/१४
पुणे १ दिनांक :- २०/०३/२०१४

प्रति,

~~अध्यक्ष/सचिव,~~
शेठ माणिकचंद फाऊंडेशन, चिखली,
ता.हवेली, जि.पुणे .

विषयः- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भः- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ. २०१३/ (८५/१३)II/ माशि-१, दिनांक ०५ ऑक्टोबर २०१३
३) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/१३/ ३१०९७/३११० दि. ०२ डिसेंबर २०१३
४) मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.अमाशा/स्वयंअर्थ/ २०१३/ १५-क (५) १०८४२ दि.२० नोव्हेंबर २०१३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | सुरु असलेल्या वर्गासहीत | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | १८३ | शेठ माणिकचंद फाऊंडेशन, चिखली, ता.हवेली, जि.पुणे | विश्वकल्याण इंग्लिश मिडीयम स्कूल, चिखली, ता.हवेली, जि.पुणे | इंग्रजी | इ.१ ली ते इ. ५ वी | जून २०१३ पासून | नवीन | प्राथमिक |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१३-१४ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

Vishwakalyan English Medium School
PRINCIPAL

(4) (4)

**कायम विना अनुदान तत्वावर**
**स्वयंअर्थसहाय्यित शाळा**

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं.:-शिक्षण/खाप्राशा/३/कावि/८९७/२०१६.
दिनांक :- २४/०८/२०१६

प्रति,
मुख्याध्यापिका,
विश्वकल्याण इंग्लिश मेडियम स्कुल
सोनवणेवस्ती, चिखली

विषयः कायम विना अनुदानित तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग /अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देणेबाबत...

संदर्भः-१) शासन निर्णय क्रं. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा( स्थापना व विनयमन) अधिनियम २०१२

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या अतिरिक्त वाढीच्या तुकडीस खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| शाळेचे नांव व पत्ता. | माध्यम | तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|
| विश्वकल्याण इंग्लिश मेडियम स्कुल, चिखली | इंग्रजी | नैसर्गिक वाढ | इ ६ वी व ७ वीच्या प्रथम वर्गास २०१५-१६ व २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात मंजुर |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे

**अटी व शर्ती :-**

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड).

२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.

४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.

५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६) सदर शाळेच्या तुकडीस विद्यार्थी संख्या नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

२४/८/१६
प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

Vishwakalyan English Medium School
PRINCIPAL

Regarding getting permission from Government for attaching VIIIth Std. under self finance scheme to VishvaKalyan English Medium school, Gat No.1207, Sonawane Vasti, Chikhali, Pune, from the year 2016-17

# Government of Maharashtra

## School Education & Sports Department

Hutatma Rajguru Chowk, Madam Kama Road, Mantralaya Annexe
Mumbai-400 032

Date : 13th September 2017

Read :

1. GovernmentResolution, School Education & Sports Department No. प्राशातु -१११२ /(२५८ /2013)/ प्राशि- ३ dated 2.7.2013
2. Director of Education(Primary)Maharashtra State, Pune, letter No.खाशाप्रा – २०१७ / १५३३०/ प्रशा-ड/ ५१२-अ-१/ ७०१ dated 14.2.2017

## GOVERNMENT RESOLUTION

Government permission is being granted to VishvaKalyan English Medium school, Gat No.1207, Sonawane Vasti, Chikhali, Pune, for attaching VIII th Std. under self finance scheme from the year 2016-17 with following terms and conditions :

1. It is binding to provide all the amenities as per Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009.
2. It will be responsibility of the institute to provide classroom for the standard.
3. Education Officer(Primary) Zilla Parishad, Pune, to ensure that the class has the minimum prescribed attendance.

Issued for and in the name of Governor of Maharashtra.

Sd/-13.9.2017
(Pravin Mundhe)
Cell Officer, Maharashtra State

1. Private Secretary, to Minister (School Education(Primary) Mantralaya, Mumbai
2. Personal Secretary to Chief Secretary, School Education, Mantralaya, Mumbai
3. Commissioner (Education) Maharashtra State, Pune.
4. Director of Education (Primary) Maharashtra State, Pune
5. Education Officer (Primary)Zilla Parishad, Pune.
6. File SM-5

---

[Note: This is a translated document from the document in Marathi language which is to be referred whenever needed for Accuracy, Validity, Legality, etc. Translated by M/s Dhii Technologies Pvt Ltd. Pune. Tel. 020-65223662, 9860357773. www.Dhii.Biz]

English Medium PRINCIPAL

Sheth Manikchand Foundation

Jitendra Mehta

Chairman

विश्वकल्याण इंग्लिश मिडीयम स्कूल गट
नं.१२०७ सोनावणे वस्ती, चिखली, पुणे या
इंग्रजी माध्यमाच्या शाळेस इ.८ वी चा वर्ग सन
२०१६-१७ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित
तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१७/प्र.क्र.६०/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: १३ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा :-</u>

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/१५३३०/प्रशा-ड/५१२-अ-१/७०१, दिनांक १४/०२/२०१७

<u>शासन निर्णय:-</u>

विश्वकल्याण इंग्लिश मिडीयम स्कूल गट नं.१२०७, सोनावणे वस्ती, चिखली, पुणे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस सन २०१६-१७ या वर्षापासून इयत्ता ८ वी चा वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ या कायदयातील तरतूदीनूसार भौतिक सोयीसुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,
२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,
३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री शिक्षणाधिकारी( प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

प्रामुंडे
१३/९/१७
(प्रविण मुंढे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे,
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे,
७. निवडनस्ती एसएम-५

नमुना - २

(स्वयंअर्थ सहाय्यित)कायम विनाअनुदानित

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/९४२/२०१४
पुणे १ दिनांक:-०६/०६/२०१४

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
शेठ माणिकचंद फाऊंडेशन, चिखली,
ता.हवेली, जि.पुणे .

**विषय :-** बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम(४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

**मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक ०१ एप्रिल **२०१३** पासून दिनांक **३१ मार्च २०१६** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी** करिता **शेठ माणिकचंद फाऊंडेशन, चिखली, ता.हवेली, जि.पुणे .संचलित, विश्वकल्याण इंग्लिश मिडीयम स्कूल, चिखली, ता.हवेली, जि.पुणे.** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

❖ **वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)** विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपल्बध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. :- ४०,००० चौ. फुट.
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. :- १०८०० चौ.फुट.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ. २०००० चौ.फुट
- वर्ग खोल्यांची संख्या. :- १५
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- ०३
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| संडास | ०४ | ०५ | ०९ |
| मुतान्या | ०८ | ०० | ०८ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा. :- आहे.
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :- **कायम विना अनुदानित शाळा असल्याने शा.पो.आहार योजना लागु नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता. :- आहे.
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:- आहे. (पुस्तकसंख्या-१२००, वर्तमान पत्रे:०२, नियतकालिके ०६)

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक प्राथ./काविअ/इं./सी.बी.एस.ई./पीसीएमसी/७९६/२०१३-१४ असा आहे. तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No. 27252000510** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**